:: **प्रेस नोट** :: दिनांक :- ०६/०८/२०२६

**सायबर फ्रॉड करीता विवीध बॅकांचे अकाऊंटस व सिमकार्ड ॲक्टीवेट करुन फसवणुक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीतील १२ आरोपींना गोवा राज्यातून मुंबई गुन्हे शाखेकडून अटक.**

यापूर्वी पायधुनी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ७६०/२०२६, कलम ३१८ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता २०२३ या गुन्हयाचे तपासामध्ये अटक करण्यात आलेल्या आरोपींकडे नमूद गुन्हयाचे अप्पर लिंक बाबत तपास करण्यात आला. त्यावेळी गुन्हयाचे तपासामध्ये मुंबई मध्ये बॅक अकाऊंटस ओपन करुन ते सायबर फ्रॉड व ऑनलाईन गेमिंग करीता गोवा राज्यात पाठवित असल्याची माहिती प्राप्त झाल्याने गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ कार्यालयाचे पथकास गोवा राज्यात पाठविण्यात आले.

त्यानंतर गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ कार्यालयाचे पथकाने दि. ०४/०८/२०२६ रोजी कॅलनगुट पोलीस ठाणे येथील केस दे निकोले विला, ओरडा कॅडोलिम, राज्य-गोवा येथे कारवाई केली असता नमूद ठिकाणी एकूण १२ इसम मिळून आले. त्यावेळी नमूद इसमांचे ताब्यातून १५ लॅपटॉप, १२८ एटीएम कार्ड, ८५ मोबाईल फोन, ७६ सिमकार्ड, २२ चेकबुक, ७७ पासबुक, ०६ राऊटर, ०३ किबोर्ड व ०२ माऊस ईत्यादी मुद्देमाल मिळून आला. नमूद आरोपी १०० पॅनल, रुद्रा अशा नावाच्या साईटचा वापर करुन युजर अकाऊंटवरुन त्यांचेकडे असलेल्या लॅपटॉप व मोबाईल फोनवरुन ऑनलाईन गेमिंग व सायबर फ्रॉड माध्यमातून आलेली रक्कम कॅश विथड्रॉवल आणि डीपॉझीटसाठी विनंती पाठवून सदरची रक्कम त्यांचेकडे असलेल्या बॅक खात्यामध्ये वळती करीत असायचे. तसेच सदरच्या कामाकरीता त्यांना ३ टक्के कमिशन मिळत असून त्यांचे साथीदार दुबई येथून सर्व रॅकेट ऑपरेट करीत आहेत.

आरोपींकडे मिळून आलेल्या काही बॅक खात्यांचे विश्लेषण केले असता त्यावर सायबर नियंत्रण कक्ष, हेल्पलाईन क्र. १९३० यावर देशभरातून बऱ्याच ठिकाणी सायबर फ्रॉड झालेबाबतच्या एकूण ८३ तक्रारी प्राप्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. नमूद आरोपींना मा. न्यायालया समक्ष हजर करण्यात आले असता त्यांची दि. ११/०८/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. कृष्ण कांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री. राज तिलक रौशन, मा. सहायक पोलीस आयुक्त, डी-दक्षिण श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-२ येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप तेजनकर, पोनि प्रशांत गावडे, सपोनि शेलार, सपोनि कुलकर्णी, पोउपनि अजीम शेख, पोउपनि संकल्प मोकल, श्रेणी पोशिचा घाटोळ, सफौ सावंत, पोह राणे, पोह पवार, पोह थिटमे, पोशि सय्यद, पोशि घरत, पोशि आव्हाड, पोशि बोटके, पोशि सिंह, मपोशि प्रियंका क्षिरसागर, पोशिचा कळसाने व पोशिचा शिंदे यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner